ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# "संयुक्त असयुक्तिकता या अध्यापन प्रतिमानाचा प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांच्या निबंध लेखनावर होणाऱ्या सर्जनशील परिणामांचा अभ्यास"

*(A Study of creative impact of Synectics Model of Teaching On trainee Primary Teacher's Essay Writing)*

**डॉ. ज्ञानेश्वर ज. भामरे**
सहयोगी प्राध्यापक, सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन
उल्हासनगर-3, जि ठाणे

## प्रस्तावना (Introduction)

गार्डन नावाच्या मानसशास्त्रज्ञाच्या मते, "सर्जनशीलता विकसित करता येते "गार्डन याचे हे मत आपल्या शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. जर सर्जनशीलता शिकविता येत असेल तर, शिक्षक म्हणून आपण त्या दृष्टीने प्रयत्न करू शकतो. या दृष्टीने सहजनशीलतेचा परिपोष करणारी उपयुक्त अध्यापन तंत्रे ,पद्धती ह्या शिक्षकाला ज्ञात असाव्यात .त्या उपयोगात यायला हव्यात ,तशी तीव्र इच्छा शक्ती हवी .गार्डनच्या या वैयक्तिक बैठकीवर आधारित' एक प्रतिमान ब्रुसजाँईस मार्शविल यांनी मांडले आहे. ते म्हणजे अध्यापनाचे संयुक्त - असयुक्तिक प्रतिमान (*Synectics* Model of Teaching) होय. यातील' संयुक्त 'शब्दाचा अर्थ जोडणे किंवा सांदणे असा होतो. विद्यार्थी दोन दोन कल्पना जोडण्याचा प्रयत्न करतात,त्यातून एक एकत्रित संयुक्त अशी नवी कल्पना उदयास येते. या प्रतिमानातील दुसरा महत्त्वपूर्ण शब्द म्हणजे 'असंयुक्तिकता' आणि याचा अर्थ म्हणजे अतार्कीकता किंवा असंबंधता असा होतो एकमेकांशी कोणताही संबंध नसलेल्या गोष्टी बऱ्याचदा आपण कोणी न पटणारे बोलले तर हा किती असयुक्तिक (विरोधी) बोलतो असे आपण म्हणतो. परंतु त्या विरोधी असंयुक्तिक बोलण्यात देखील खूप अर्थ दडलेला असतो.

## प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व (Importance of Research)

संयुक्त -असुयुक्तीक या अध्यापन प्रतिमानाचा वापर प्राथमिक शिक्षकांना करता आला तर ते आपल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेचा विकास करू शकतील. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारक्षमतेला चालना मिळेल .लेखन क्षमतेसाठी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला महत्त्व असते. त्याचबरोबर अभिव्यक्ती शैली ही सर्जनशील असावी लागते .या दोन्ही गोष्टीला संयुक्त असयुक्तिकता प्रतिमान चालना देते.

## प्रस्तुत संशोधन अभ्यासाची कार्यपद्धती (Procedure of Present Research Study)

पूर्व चाचणीचा एक भाग म्हणून प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांकडून मर्यादित वेळेत 'पावसाळा' या विषयावर निबंध लिहून घेतला .नंतर अध्यापनाच्या संयुक्त- असंयुक्तिक प्रतिमानाच्या पदबंधाचे वर्णन करून पुन्हा त्याच विषयावर मर्यादित वेळेत निबंध लिहून घेतला .दोघांची तुलना केली तेव्हा या अध्यापन

प्रतिमानाच्या वापरानंतर प्राथमिक शिक्षकांच्या निबंध लेखनात सर्जनशील विचार व्यक्त झाले आहेत का ? याचा अभ्यास करण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research)**

1. प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांची सुप्त प्रतिभा शक्ती जागृत करणे.
2. प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांच्या निबंध लेखनात प्रयत्नपूर्वक सर्जनशीलतेचा विकास करणे .
3. अध्यापनाच्या संयुक्त - असयुक्तिक प्रतिमानाचा वापर करून प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांनी लिहिलेले निबंध लेखन आणि त्यांनीच तत्पूर्वी केलेले पारंपरिक निबंध लेखन यांची तुलना करून त्यांच्या निबंध लेखनातील सर्जनशीलता अभ्यासणे.

**व्याप्ती –मर्यादा (Scope- limitations) -**

सदर संशोधन हे य .च .म .मुक्त विद्यापीठाच्या सेवा सदन्स कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर-3, केंद्राच्या बी.एड् .पदवीसाठी प्रशिक्षण घेत असलेल्या 50 प्राथमिक शिक्षकांपुरताच मर्यादित आहे.

**परिकल्पना (Hypothesis) -**

प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांनी पारंपरिक पद्धतीने लिहिलेले निबंध लेखन आणि अध्यापनाच्या संयुक्त- असयुक्तिक प्रतिमानाचा वापर करून लिहिलेले निबंध लेखन यात कोणताही लक्षणीय फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

सदर संशोधनासाठी संशोधनकर्त्याने प्रायोगिक संशोधन पद्धतीचा (Experimental Research Method ) वापर केला आहे.

**नमुना (Sampling)**

सदर संशोधनासाठी 50 बी. एड् प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली असून हे सर्व प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षक हे य.च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सेवा सदन्स कॉलेज ऑफ एज्युकेशन उल्हासनगर- 3 ,या केंद्रावरील आहेत.

**संशोधन साधन (Research Tool)**

अध्यापनाच्या संयुक्त असयुक्तिक प्रतिमानाचा आदर्श पाठ टाचण आराखडा (Ideal Lesson Plan) व त्यातील पदबंध हे संशोधन साधन म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वापरले आहे.


**सांख्यिकी (Statistics)**

प्रस्तुत संशोधनात सांख्यिकीचा वापर करताना, मध्यमान, प्रमाण विचलन, 't'-चाचणी मूल्य', यांचा वापर केला आहे.

**माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ (Data Analysis and Interpretation)**

**Table 11.1 संयुक्त असयुक्तिक प्रतिमानातील घटक–**

| घटक | पूर्व चाचणी | शिक्षक प्रतिसाद | शेकडेवारी | उत्तर चाचणी | शिक्षक प्रतिसाद | शेकडेवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सद्यस्थिती वर्णन | 25 | 50% | सद्यस्थिती वर्णन | 38 | 76% |
| 2 | प्रत्यक्ष उपमा | 65 | 12% | प्रत्यक्ष उपमा | 23 | 46% |
| 3 | वैयक्तिक उपमा | 5 | 10% | वैयक्तिक उपमा | 28 | 56% |
| 4 | संवृत्त द्वंद | 3 | 6% | संवृत्त द्वंद | 33 | 66% |
| 5 | नवीन प्रत्यक्ष उपमा | 5 | 10% | नवीन प्रत्यक्ष उपमा | 35 | 70% |
| 6 | पारंपरिक निबंध लेखन (मूळ आशय) | 24 | 48% | प्रतिमानाचा वापर करून निबंध लेखन(मूळ आशयाचे पुनर्परीक्षण) | 45 | 90% |




वरील तक्त्यात पूर्व चाचणीत पारंपरिक पद्धतीने किती प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांनी सहा घटकांना अनुसरून लेखन केले आहे आणि उत्तर चाचणीत किती प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांनी संयुक्त-

असयुक्तिक या अध्यापन प्रतिमानातील सहा घटक समजावून दिल्यानंतर त्याचा वापर करून निबंध लेखन केले आहे हे दर्शविले आहे. या माहितीच्या संदर्भाने शेकडेवारी, मध्यमान, प्रमाणविचलन आणि ‘t’-चाचणी 'परीक्षण या सांख्यिकीचा उपयोग करण्यात आला व निष्कर्ष काढण्यात आले.

**परिकल्पनापरिक्षण (Hypothesis Testing)**

| Tet | Mean | S.D. | N | Obtained t-value |
|---|---|---|---|---|
| **Pre-Test** | 21.827 | 7.2135 | 50 | 4.226 |
| **Post Test** | 28.241 | 7.9162 | 50 | |

**अन्वयार्थ (Interpretation)**

0.01 या पातळीसाठी 2.37 तक्तामूल्य व 0.05 या पातळीसाठी 1.97 तक्तामूल्य लक्षात घेता प्राप्त 't मूल्य' हे तक्ता मूल्यापेक्षा जास्त असल्याने पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यात लक्षणीय फरक आढळून येतो व परिकल्पना अस्विकाराहं(Rejected) ठरते.

**निष्कर्ष-अनुमान (Finding and Conclusion)**

1. अध्यापनाच्या संयुक्त- असयुक्तिक प्रतिमानाच्या वापरानंतर प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांच्या निबंध लेखनासंदर्भात त्यांची सुप्त शक्ती जागृत झाल्याचे त्यांच्या उत्तर चाचणीतील निबंध लेखनाच्या अविष्कारातून दिसून येते.

2. अध्यापनाच्या संयुक्त- असयुक्तिक प्रतिमानाचा निबंध लेखनात अवलंब केल्यामुळे प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा जाणीवपूर्वक विकास करता येतो हे त्यांनी उत्तर चाचणी लिहिलेल्या निबंधावरून दिसून येते.

3. प्रशिक्षणार्थी प्राथमिक शिक्षकांच्या पारंपरिक पद्धतीने लिहिलेला निबंध व त्यांनीच संयुक्त-असंयुक्तिक या अध्यापन प्रतिमानाचा वापर करून उत्तर चाचणीत लिहिलेला निबंध यात लक्षणीय फरक आढळून येतो एवढेच नव्हे तर उत्तर चाचणीतील त्यांच्या निबंधात कल्पनाशक्ती व सर्जनशीलता यांचा अविष्कार पारंपारिक पद्धतीने लिहिलेल्या निबंधाच्या तुलनेत जास्त आढळून येतो. याचाच अर्थ , निबंध लेखनातील सर्जनशील विचार ,कल्पना ,संदर्भात अध्यापनाचे संयुक्त - संयुक्तिक प्रतिमान हे अधिक प्रभावी ठरते.

**निवडक संदर्भ (References) -**

आरकडी इंदुमती, चौत्रे रघुनाथ(2007) 'संयुक्त-असयुक्तिक प्रतिमान', नाशिक: य .च. म. मुक्त विद्यापीठ प्रकाशन.
Joyce Bruce, weil Marsha(1979), 'Models Of Teaching', 5th Ed., Delhi:Prentice Hall Publication.
Weil M., Joyce B. and Kluwirs B (1978), Englewood Cliff N.J, Delhi; Prentice Hall Publication.